MHAU120006162025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–२०६/२०२५**
**सुमनबाई वि. अनिताबाई**

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

०१. अर्जदार क्र.१ ते ४ यांनी सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

०२. अर्जदारांच्या अर्जात असे आले आहे की, मयत **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** यांचा मृत्यु दि.०६.१२.२०२१ रोजी मौजे घोसला, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे झाला आहे. तसेच अर्जदारांच्या अर्जात पुढे असे आले आहे की, ते व गैरअर्जदार हे मयत **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** यांचे वारस आहे. सबब, अर्जदाराने सदरचे प्रकरण हे मयतांचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

**०३.** अर्जदार क्र.१ सुमनबाई युवराज पाटील उर्फ बावस्कर हिने तिच्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र. ८** वर दाखल केला. तसेच तिने पुढे कथन केले की, ती मयत युवराज यांची पत्नी आहे, अर्जदार क्र.२, ३ व गैरअर्जदार हया मुली व अर्जदार क्र.४ हा मुलगा आहे. तसेच मयत युवराज याची आई ४० वर्षापुर्वी मयत झालेली आहे. तसेच अर्जदारांनी मयत **युवराज** यांचे मृत्युप्रमाणपत्र **नि.क्र. ९** वर दाखल केले. गैरअर्जदार हिस नोटीसची बजावणी होवून सुध्दा ती हजर झाली नाही, म्हणुन तिच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर अर्जदार यांनी **नि.क्र.– ११** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**०४.** अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. आर. ए. गिरी यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार व गैरअर्जदार हे मयत **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** यांचे वारस आहे, तसेच अर्जदारांना शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

**०५.** विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन **औरंगाबाद** आवृत्तीच्या दिनांक ०६.०७.२०२५ रोजीच्या **"तरुण भारत"** पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली, ती नि. क्र.१० वर अभिलेखात दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा ग्रामपंचायत कार्यालय

जामठी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल अभिलेखात दाखल आहे.

**०६.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, त्यांचा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. याठिकाणी एक महत्वाची बाब नमुद करावीशी वाटते की, गैरअर्जदार ही प्रकरणात जरी हजर झाले नाही, तरी अर्जदाराच्या पुराव्यानुसार ते वारस म्हणून वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत. अर्जदारांनी दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** हे **दि.०६.१२.२०२१** रोजी मयत झाले. तसेच अर्जदार क्र.१ ते ४ व गैरअर्जदार हे मयत **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** यांचे वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार क्र.१ सुमनबाई युवराज पाटील (बावस्कर), क्र.२ मिनाबाई संजय चौधरी, क्र.३ अर्चना पांडुरंग पाटील व क्र.४ भगवान युवराज पाटील व अनिताबाई एकनाथ पाटील हे मयत **युवराज कडुबा पाटील (बावस्कर)** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारास कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

४. अर्जदार यांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

**दिनांक – १३.०३.२०२६**

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.03.14 13:50:17 +0530

[एम. बी. पाटील]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सोयगांव